# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 03 December 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०३ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- राष्ट्रपतींच्या हस्ते आज दिव्यांग सक्षमीकरण पुरस्काराचं वितरण, दिव्यांगांसाठी अनेक कल्याणकारी योजनांचाही शुभारंभ
- लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासोबतच्या सर्वपक्षीय बैठकीनंतर आजपासून संसदीय कामकाज सुरळीत होणार
- भारतीय जनता पक्षाकडून विधीमंडळ नेतेपदाच्या निवडीसाठी केंद्रीय निरीक्षकांची नेमणूक
- ईव्हीएमबाबत खोटे दावे करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांविरोधात निवडणूक आयोग दाखल करणार गुन्हे

आणि

- उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज मुंबई दौऱ्यावर, केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी समारंभात होणार सहभागी

****

आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येणार आहेत. यावेळी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी १६ कल्याणकारी उपक्रमांचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

****

संसदीय कामकाजाची कोंडी सोडवण्यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काल सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घेतली. या बैठकीत सर्व राजकीय पक्षांनी, सभागृहाचं कामकाज सुरळीत चालवण्याचं मान्य केलं. काँग्रेसचे गौरव गोगोई, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव यांच्यासह इतर सदस्य यावेळी उपस्थित होते.

१३ आणि १४ डिसेंबर रोजी लोकसभेत संविधानावर विशेष चर्चा होणार आहे. त्यानंतर राज्यसभेतही चर्चा होईल. विरोधकांनी सहमती दर्शवल्यानंतर आजपासून संसदेचं कामकाज सुरळीत सुरू होईल, आज पहिलं विधेयक लोकसभेत आणि नंतर राज्यसभेत मांडलं जाईल तसंच विरोधकांनी दिलेल्या आश्वासनामुळे कामकाज सुरळीत पार पडेल, असं केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं.

दरम्यान, एका खासगी कंपनीचं कथित लाचखोरी प्रकरण आणि संभलमधल्या हिंसाचारासह विविध मुद्द्यांवरून संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज काल सलग पाचव्या दिवशी बाधित झालं.

****

राज्यात सरकारस्थापनेच्या दृष्टीनं, भारतीय जनता पक्षाच्या विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून भाजपाच्या संसदीय मंडळानं गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची नेमणूक केली आहे. भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ पक्षाची बैठक उद्या चार तारखेला होणार असून, त्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे. राज्यात नवीन सरकारचा शपथविधी येत्या गुरुवारी पाच तारखेला होणार आहे.

दरम्यान, भाजप नेते गिरीश महाजन यांनी काल काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. शिंदे यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी ही भेट घेतली असून, महायुतीमध्ये कोणतेही मतभेद नाहीत असं महाजन यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

****

शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपद मिळणार असल्याचं वृत्त निराधार असल्याचं श्रीकांत शिंदे यांनी समाजमाध्यमावर स्पष्ट केलं. यापूर्वी आपल्याला केंद्रात मंत्रिपदाचा प्रस्ताव मिळाला होता, मात्र आपण तो नाकारला,

पक्ष संघटना आणि लोकसभा मतदार संघावर लक्ष केंद्रीत करणार असून, राज्यातल्या कोणत्याही मंत्रिपदात आपल्याला रस नाही, असं त्यांनी म्हटलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीत मतमोजणीमध्ये पोस्टल मतदान आणि इव्हिएममधल्या मतदानामध्ये तफावत दिसत असून, पोस्टल मतदानाचा जो ट्रेंड आहे, तो इव्हिएममधल्या मतदानात दिसत नाही, अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सचिव आणि आमदार वरुण सरदेसाई यांनी दिली. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी काही मतदारसंघातल्या उमेदवारांना मिळालेल्या आकडेवारीची माहिती दिली. या ट्रेंडबद्दलचा खुलासा निवडणूक आयोगाने करावा, अशी मागणी सरदेसाई यांनी केली.

****

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम अर्थात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे खोटे दावे करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, एस. चोक्कलिंगम यांनी दिला आहे. तसंच मतदानाच्या दिवशी संध्याकाळी वाढलेल्या मतदानाच्या आकडेवारीविषयीही त्यांनी खुलासा केला, ते म्हणाले.

***‘‘आपण एक लक्षात ठेवा पाच ते सहाच्या नंतर सहाला कोणी क्यू मध्ये उभे होते त्यांना मतदान करायला अधिकार होते. म्हणून पूर्ण दिवसामध्ये कुठल्याही स्तरावर किती टक्केवारीने वाढले, किती नंबरला वाढले एवढेच नंबर पाचच्या नंतर सुद्धा वाढलेले आहेत. चुकून आपण झारखंडच्या सोबत काही कम्पॅरिजन होत आहे. झारखंड मध्ये पाच वाजता मतदान क्लोज झालेला आहे ऑफिशियली. महाराष्ट्र मोठा राजे असल्यामुळे सहा वाजता बंद झाले. झारखंड पूर्वीपासून अरली वोटिंग राज्य आहे. म्हणजे लवकर येऊन लोक मतदान करून जातात. सात ते नऊ मध्ये त्यांच्या परसेंटेज पाहिलं तर फार मोठा असतो आपल्याकडे सात ते नऊ मध्ये कमी असतं.’’***

****

दिल्ली इथं होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं स्वागताध्यक्षपद ज्येष्ठ नेते शरद पवार भूषवणार आहेत. संमेलनाच्या समितीची ही मागणी पवार यांनी स्वीकारल्याची माहिती, समितीच्या वतीनं डॉ. सतीश देसाई आणि संजय नहार यांनी काल पुण्यात दिली.

****

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी समारंभाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन होईल. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान हे देखील या कार्यक्रमाला संबोधित करतील. संस्थेच्या शतकमहोत्सवी वर्षाचं औचित्य साधून 'अमृतकाळात कापसावरची उत्पादनानंतरची प्रक्रिया' या विषयावरच्या परिसंवादाचं आयोजनही करण्यात आलं आहे.

****

जागतिक एड्स दिन एक डिसेंबर रोजी पाळण्यात आला, त्यानिमित्त विविध ठिकाणी कालही अनेक जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर शहरात काल जाणीवजागृती रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी क्रांती चौक इथं या रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसचं महाविद्यालयातले विद्यार्थी, नागरिक या रॅलीत सहभागी झाले होते. प्रसिद्ध रंगकर्मी मदन मिमरोट यांच्या कलापथकाने जागृतीपर सादर केलेल्या कार्यक्रमाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

हिंगोलीत काल जिल्हा सामान्य रुग्णालय आणि शासकीय परिचारिका प्रशिक्षण केंद्रानं जनजागृती रॅली काढली होती. हिंगोलीच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी या रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. उपस्थितांना या कार्यक्रमात एड्स नियंत्रणाबाबत शपथ देण्यात आली.

बीड इथंही जागतिक एड्स दिनानिमित्त काल छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनपर्यंत जनजागृती प्रभातफेरी काढण्यात आली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव जी.जी.सोनी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांनी हिरवा झेंडा दाखवून या फेरीला सुरुवात केली. सर्व उपस्थितांना यावेळी एड्स मुक्त जीवन जगण्याची शपथ देण्यात आली.

लातूर इथंही जिल्हा एड्स प्रतिबंध आणि नियंत्रण पथक तसंच जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्यावतीने काल रॅली काढण्यात आली. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय इथून अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, जिल्हा शल्य

चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थितांना एड्सविरोधी शपथ देण्यात आली.

****

परभणी जिल्ह्यात हिवाळी हंगामातल्या रब्बीच्या पिकांसाठी जायकवाडी, निम्न दुधना आणि येलदरी धरणातून कालव्यातून पाणी सोडण्यात आलं आहे. ही शेतकऱ्यांसाठी आनंदाची बाब असली तरी याचदरम्यान महावितरणकडून विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्यानं कमी दाबाची वीज मिळत असल्याने मोटार पंप जळण्याचं प्रमाण वाढलं आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. रब्बीच्या पेरणीचा कालावधी संपत असल्याने वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी शेतकरी करत आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर शहरानजीक सातारा परिसरातल्या खंडोबा अर्थात मार्तंड भैरव यात्रेला कालपासून प्रारंभ झाला. या यात्रेत राज्यभरातून लाखो भाविक सातारा परिसरात येत असतात. येत्या सात ते नऊ डिसेंबर दरम्यान दर्शनाला होणारी गर्दी लक्षात घेऊन मंदिर देवस्थानकडून चोख व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती, देवस्थानचे सचिव साहेबराव पळसकर यांनी दिली.

****

पुरुष हॉकी कनिष्ठ आशिया कप स्पर्धेत भारत आणि मलेशिया यांच्यात आज उपांत्य फेरीचा सामना होणार आहे. ओमानमध्ये मस्कत इथं संध्याकाळी साडे आठ वाजता सामन्याला सुरुवात होईल. उपान्त्य फेरीतला दुसरा सामना पाकिस्तान आणि जपान यांच्यात होणार असून, या स्पर्धेतला अंतिम सामना उद्या होणार आहे.

****

संयुक्त अरब अमिरातीतल्या शारजाह इथं सुरु असलेल्या १९ वर्षाखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत काल अ- गटात भारताने जपानचा २११ धावांनी पराभव केला. अ -गटातल्या दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानने संयुक्त अरब अमिरातीच्या संघाला ६० धावांनी पराभूत केलं.

****

हवामान

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या फेंगल चक्रीवादळामुळे राज्यातल्या अनेक भागात ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे थंडी कमी झाली आहे. काल परभणी

शहरासह काही भागात जोरदार पाऊस झाला. ढगाळ वातावरण आणि पावसामुळे हरभरा, तूर पिकांवर अळीचा प्रादुर्भाव होत आहे तर शेवटच्या टप्प्यातला कापूस भिजल्यानं नुकसान झालं आहे.

दरम्यान, येत्या दोन दिवसात, राज्यातल्या चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

****